Website

# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

(अधिष्ठाता यांचे कार्यालय)

SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED

PH NO (02446)245792/248963/249362/248438/-DFAX02446/247132 Website www.srtrmca.org emailsrt.acad@rediffmail.com

जा.क्र. वैमअं/किभांवि/दरपत्रके मागणी/ 5509 /२०२१ दिनांकः- 31/०५/२०२१

कार्यालयीन आदेश

विषय :- जीएसटी,टीडीएस व टॅक्स रिटर्न, फॉर्म नं.१६ & १६-A व २४ क्यु,२६ क्यु इ.बाबींचे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता दरपत्रक सादर करणे बाबत..

संदर्भ :-१.दि.०५.०५.२०२१ रोजीची खरेदी समितीची बैठक.

२.दि.२४.०५.२०२१ रोजीची मंजुर टिपणी.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालय विभागांतर्गत प्रशासकीय कार्यालयातील विविध आस्थापनांकरीता जीएसटी, टीडीएस व टॅक्स रिटर्न, फॉर्म नं. १६ & १६-A व २४ क्यु ,२६ क्यु इ.बाबींचे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता दरपत्रक खालील प्रमाणे सोबत जोडलेल्या यादीनुसार सादर करण्यात यावे.

तसेच सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता,स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावी.तसेच सदरील दरपत्रक सादर करण्यासाठी अंतिम दिनांक 08/06/ २०२१ रोजी दुपारी ०५:०० वा. पर्यंत असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 09/06/२०२१ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील. तसेच दरपत्रकधारकास दरपत्रके उघडण्याकरीता उपस्थित राहवयाचे असल्यास या कार्यालयाची काही हरकत नाही.

| अ.क्र. | साहित्यांचे नाव | नग संख्या | प्रत्येकी दर |
|---|---|---|---|
| ... | सोबत अ.क्र.०१ ते अ.क्र.०६ पर्यंतची यादी जोडण्यात आलेली आहे. | एकुण ०६नग | ... |

अटी व शर्ती :-

१. दरपत्रक धारकाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासन मान्य नोंदणी प्रमाणपत्र किंवा सुक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र तसेच कर सल्लागार असल्याबाबत शासनाचे मान्यता प्राप्त वैध प्रमाणपत्र छायांकीत प्रत दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक आहे.

२. दरपत्रक धारकाच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, नोंदणी क्रमांक,जिएसटी नंबर व पॅन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सहि व शिक्का असलेली दरपत्रके सदर बाबीच्या अ.क्र. यादीनुसार सादर करण्यात यावी. तसेच ज्या बाबींचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. (NA) असे नमुद करावे.

३. दरपत्रका सोबत शासन मान्य जिएसटी प्रमाणपत्र, फर्मच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छायांकीत प्रत तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वतः स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. (सदर प्रमाणपत्र नमुना देण्यात आलेला आहे.) तसेच मागील ५ व वर्षांचे आयकर (GST) भरणा प्रमाणपत्र सादर करावे.

४. दरपत्रकातील बाबींचे दर शासन नियमानुसार सर्व करांसहित जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये.तसेच करां संबंधीची सर्व कामे स्वतः स्वखर्चाने पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही. तसेच सर्व बाबींकरीता जीएसटी समाविष्ठ आहे किंवा नाही या बाबत नमुद करावे.

५. मागविण्यात आलेल्या बाबींचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांका पासुन ते ३१ मार्च २०२२ पर्यंत वैध राहतील.

६. प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

७. सदरील कराबाबतच्या कामाकरीता येणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थितरित्या मार्गदर्शन करुन निपटारा करावा व कामात काही गूंतागुंत निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच कराबाबतची सर्व कामे चांगल्या प्रतीचे असावे तसेच निकृष्ठ दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रद्य करण्यात येतील व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.

८. तसेच अपुर्ण माहितीसह व शासन मान्यता प्राप्त प्रमाणपत्रा शिवाय सादर केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीकरण नाकारण्यात येतील तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी काही अडचण निर्माण झाल्यास सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्य करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.

९. उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदरचे दरपत्रक सादर करावे.

Incharge Store
Petty Supply
S.R.T.R.G.M.C. Ambajogai

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकिय महाविद्यालय,अंबाजोगाई.

प्रतः- १.संस्थेची वेबसाईट ,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.
२.नोटीस बोर्ड महाविद्यालय विभाग,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.

01.06.21
11.03 am

जा.क्र. 5509/दि. 31.05.2021

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई या संस्थेकरीता लागणाऱ्या खालील प्रमाणे जीएसटी,टॅक्स रिटर्न, टीडीएस, फॉर्म नं.१६ & १६-A व २४ क्यु,२६ क्यु इ.बाबींचे दरपत्रक देण्यात यावे.

| Sr.no. | Name of the Item | Qunt. | Rate |
|---|---|---|---|
| **For 24 Q & For 26 Q** | | | |
| ०१ | **Per Entry Salary Details Filling Fees** | **Per Entry** | ... |
| ०२ | **GST & TDS return preparation & Filling Fees** | **Per Quarter** | ... |
| ०३ | **Employees Form No. 16 & Form NO. 16 – A Fees** | **Per Employee** | ... |
| ०४ | **Employees Assessment Form Printing Fees** | **Per Employee** | ... |
| ०५ | **Any Previous Quarter Revised return Fees** | **Per Quarter** | ... |
| ०६ | **Internal Audit Fees** | **Per Section** | |

नोट :- उपरोक्त प्रमाणे कराबाबतच्या कामाकरीता येणाऱ्या सर्व वर्ग १ ते वर्ग ४ अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थितरित्या मार्गदर्शन करुन निपटारा करावा व कामात काही गूंतागुंत निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदर दरपत्रका सोबत मागणी करण्यात आलेले आपल्या फर्मचे खालील प्रमाणे सर्व प्रमाणपत्र जोडण्यात यावे अन्यथा दरपत्रके रद्द करण्यात येतील. तसेच रद्द केलेल्या संबंधीत दरपत्रकाबाबत लेखी कळविण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

1. **Quotation Letter**
2. **Income Tax Practitioner Govt. Certificate Copy**
3. **Sales Tax Practitioner Govt.Certificate Copy**
4. **Prof. Tax Registration Govt.Certificate Copy**
5. **PAN Card Copy**
6. **ITR –V Return Copy**
7. **GST Registration Copy**
8. **Shop Act Registration Copy**

अधिष्ठाता
स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई

31.5.21

**Incharge Store**
Petty Supply
S.R.T.R.G.M.C. Ambajogai

जा.क्र. ५५०९/०७.३१.०५.२०२१

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आपल्या कार्यालयाच्या दरपत्रक मागणी आदेशानुसार मागविण्यात आलेल्या जीएसटी, टीडीएस व टॅक्स रिटर्न, फॉर्म नं.१६&१६-A व २४ क्यु , २६ क्यु इ.बाबींची दरपत्रकात माझे स्वतःचे एकच दरपत्रक असुन आपणास प्राप्त झालेल्या दरपत्रकात माझे दुसरे दरपत्रक सादर करण्यात आलेले नाही. तसेच याबाबत पुढील काळात आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील. करीता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाचीस्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

ठिकाण :-

नाव :-

पत्ता :-

मो.नं. :-